POSHAN Abhiyaan
PM's Overarching Scheme for Holistic Nourishment
सही पोषण - देश रोशन

सत्यमेव जयते

नए समाज की ओर

# ही मासिक बैठक का?



महिला व बालविकास मंत्रालय
भारत सरकार २०१८

1





# बाळाच्या जन्माची गोष्ट

सगळ्यांना स्पष्ट सांगा की या बैठकीचा उद्देश समजून घेण्यासाठी आपण एका गोष्टीने सुरूवात करू.

चर्चा सुरू करण्यासाठी गोष्ट (जी उजव्या बाजूला दिलेली आहे) मोठ्याने वाचा.

सहभागी बरोबर गोष्टीची तपशीलवार चर्चा करणे आणि त्यांना आलेल्या अशा प्रकारचे अनुभव सांगण्यास प्रोत्साहन द्या.

## विचारा :

आपल्यापैकी कोणी प्रसुती दरम्यान किंवा प्रसुतीसंबंधी काही कारणाने मातेचा मृत्यु झालेला पाहिला आहे का, काजल सारखा ?

आपल्यापैकी कोणी लल्ला सारखा बालमृत्यु झालेला पाहिला आहे का ?

सहभागींना त्यांच्या स्वत:च्या अनुभवावरून त्याची कारणे सांगू द्या.

विचारत रहा, आणखी काय ?

एका कागदावर सहभागींनी सांगितलेल्या मृत्यु व कुपोषणाच्या कारणांची यादी बनवा.

त्यांनी जर अनेक कारणांपैकी गरीबी आणि खालच्या दर्जाची सामाजिक स्थिती असे नमूद केलेले नसेल तर विचारा:

ते कुटुंब जर सुशिक्षित आणि संपन्न असते तर असे घडले असते का ?
अशा परिस्थितीत त्यांनी काय केले असते ?

## गोष्ट :

ही गोष्ट आहे राहुल व काजलची, जे आपल्यासारखे खेड्यात रहात होते.

राहुल व काजल यांच्या लग्नाला तीन वर्षे झालेली होती. त्यांची पहिली मुलगी सिमा आता दोन वर्षाची आहे. सिमा जेव्हा एक वर्षापेक्षा थोडी मोठी झाली त्यावेळी काजलने तिच्या मुलाला जन्म दिला.

एकाएकी अचानक लल्लाचा जन्म घरी झाला. रात्री खूप उशीरा काजलला बाळंतपणाच्या कळा सुरू झाल्या. राहुलची आई आणि शेजारच्या बाईने कशीबशी घरी प्रसुती पार पाडली.

लल्लाच्या जन्मामुळे घरात आनंदाचे वातावरण पसरले कारण तो पहिला मुलगा होता. दुर्दैवाने, आनंदाचे वातावरण चिंतेमध्ये बदलले, जेव्हा त्यांच्या लक्षात आले की काजलची स्थिती प्रसुतीनंतर सातत्याने खालावत चालली आहे. बाळाच्या जन्मानंतर तिचा रक्तस्त्राव सुरूच राहिला आणि जो रक्तस्त्राव काही थांबत नव्हता. सगळ्यात जवळचे हॉस्पिटल तीन तास अंतरावर होते आणि घाबरून जाऊन त्यांनी शेजारच्या खेड्यातून दाईला बोलवायचे ठरविले. ती देखील सकाळी आली, त्यावेळी खूप उशीर झाला होता कारण काजलची तब्येत जास्त बिघडली होती आणि त्याच दिवशी तिचा मृत्यु झाला.

राहुल आणि त्याच्या कुटुंबाला फार मोठा धक्का बसला. योग्य ती काळजी घेण्यास कोणी नसल्यामुळे लल्लाची तब्येत जास्त गंभीर झाली. त्याच्या आज्जीने त्याला बकरीचे दूध देऊन वाढविण्याचा प्रयत्न केला आणि काही वेळा ती पाणी पाजत असे. परंतु लल्ला आजारी पडू लागला, त्याला कधी ताप तर कधी जुलाब होऊ लागले. त्याचे वजन कमी झाले, त्याची तब्येत नाजूक बनली. त्याच्या आईच्या मृत्युनंतर सुमारे एक महिन्यांनी लल्लाने देखील शेवटचा श्वास घेतला. आता एक वर्षानंतर सिमाची काळजी घेण्यासाठी कोणी नाही आहे. ती अशक्त झाली आहे आणि सतत आजारी पडत असते. ज्याला आपण गंभीर कुपोषित बाळ म्हणतो अशी तिची अवस्था झालेली आहे.



# बाळाच्या जन्माची गोष्ट







Module 1.indd 3 3/18/2018 1:30:44 PM



## काजल, लल्ला व सिमाला वाचविण्यासाठी आपण काय करू शकलो असतो?

कार्ड दाखविणे आणि एका सहभागीला कार्डवरील प्रश्न वाचायला सांगणे.

सहभागींना प्रश्नांची उत्तरे द्यायला आणि चर्चा करायला सांगणे.

चर्चेला मदत म्हणून अधून मधून खालील प्रश्न विचारणे:

काजलच्या मृत्युचे कारण काय होते?

लल्लाच्या मृत्युचे कारण काय होते?

सिमा इतकी अशक्त का होती? तिच्या सध्याच्या कुपोषण स्थितीचा तिच्या शारीरिक वाढ आणिमानसिक विकासावर कसा परिणाम झाला असेल?

काजल आणि लल्लाचे आयुष्य वाचविण्यासाठी आपण काय करू शकलो असतो?

आशा किंवा अंगणवाडी सेविका सिमाला कशी मदत करू शकले?

आपण येथे सर्व कुटुंबासाठी आहोत, यावर जास्त भर देणे, परंतु आपण येथे अशा कुटुंबासाठी आहोत जे स्वत:ला मदत करू शकत नाहीत.

याचा समारोप करीत असताना सहभागींना खूप जास्त माहित असणे आणि आपल्या ज्ञानाचा योग्य वेळी वापर करून आपण सर्वांनी केलेल्या कार्यामुळे जीव वाचविणे किती सोपे आहे हे नमूद करणे.




# काजल, लल्ला व सिमाला वाचविण्यासाठी आपण काय करू शकलो असतो ?




- काजल व लल्लाचा मृत्यु कशामुळे झाला ? सिमाची स्थिती इतकी खराब कशामुळे झाली ?

- त्यांचे जीव वाचविण्यासाठी आपण काही करू शकलो असतो का ? आपण काय केले असते त्यांचा जीव वाचविण्यासाठी ?

- सिमासाठी आपण काय करू शकतो ?







# ही मासिक बैठक का आहे?

कार्ड दाखविणे आणि सहभागींना प्रत्येक मुद्दा वाचायला सांगणे.

सहभागींना दोन उद्देशांची उदाहरणे द्यायला सांगणे.

तुम्ही आरोग्यदायी पद्धतीची उदाहरणे देऊ शकता का?
तुम्ही महत्वपूर्ण आरोग्य सेवेची उदाहरणे देऊ शकता का?

चर्चा सुलभपणे होण्यासाठी उजव्या बाजूला दिलेल्या यादीचा वापर करणे. स्पष्ट सांगणे, की आपण एकत्रितपणे कुटुंबाना त्यांनी आरोग्यदायी वागणूक कशी अवलंबावी आणि सर्व महत्वाच्या आरोग्य सेवा कशा घ्याव्यात/वापर करावा यासाठी कशी मदत करावी हे आपण शिकायचे आहे.

आरोग्यदायी वागणुकीची उदाहरणे

- जन्मानंतर लगेच स्तनपान करायला देणे.
- बाळाच्या जन्माची तयारी करणे.
- नव्याने जन्मलेल्या अशक्त बाळाची घरी काळजी घेणे.
- सहायक नर्स मिडवाईफ/अंगणवाडी सेविकाने दिलेल्या लोह असणाऱ्या गोळ्यांचे सेवन करणे.
- आणीबाणीच्या केसमध्ये योग्य रूग्णालयात जाणे.

आरोग्य सेवेची उदाहरणे

- लसीकरण
- प्रसुतीपूर्व तपासणी
- जवळच्या रूग्णालयात लोह असणाऱ्या गोळ्या उपलब्ध करणे.
- जुलाब होणाऱ्या मुलांना ओआरएस पुरविणे.



# ही मासिक बैठक का आहे ?



राहूल, काजल, सिमा व लल्ला यासारख्या लोकांना कशी मदत करायची हे शिकवण्यासाठी आपण पत्येक महिन्याला भेटू.

एकमेकांपासून, पर्यवेक्षकाकडून आणि आपल्याला दिल्या जाणाऱ्या सामुग्रीपासून आपण शिकू.

खालील दोन उद्देश प्रभावीपणे कसे साध्य करायचे हे आपण शिकू.

१. आपल्या समाजातील सर्व कुटुंबानी आरोग्यदायी वागणूक पद्धतींचा वापर करावा.

२. आपल्या समाजातील सर्व कुटुंबाना महत्वाच्या सर्व आरोग्य सेवा मिळाल्या पाहिजेत.

हे उद्देश साध्य करणे खूप सुलभ होईल जर आपण टीम म्हणून एकत्र काम केले आणि आपापल्या जबाबदाऱ्या वाटून घेतल्या.





# या बैठकीमध्ये प्रत्येक महिन्याला आपण काय करणार आहोत?

कार्ड दाखविणे आणि सहभागींपैकी एकाला वाचायला सांगणे.

वाचून झाल्यावर, उजव्या दिलेल्या मार्गदर्शनाचा वापर करून प्रत्येक बैठकीमध्ये करायची तीन मुख्य कामे स्पष्ट सांगणे.

मासिक बैठकीत प्रत्येकी एक तासात आपण दोन विषय संपविण्याचा प्रयत्न करू हे स्पष्ट सांगणे.

## १. पुनरावलोकन

**गेल्या महिन्यात आपण आखलेल्या योजन आपण कशा पार पाडल्या याची पुर्नपहाणी करू.**

- आपल्याला कोणत्या अडचणी आल्या.
- आपण काय शिकलो.
- आपण किती कुटुंबियांना पटवून देऊ शकलो.

## २. नवीन काहीतरी शिकणे

**आपल्याला काय माहिती आहे त्यापासून सुरूवात करून आपण आपल्या ज्ञानात केवळ नवीन ज्ञान नव्हे तर नवीन कौशल्य देखील भर घालीत राहू:**

- स्तनपानाचे निरीक्षण कसे करायचे.
- अशक्त नवजात बाळाची घरी कशी काळजी घ्यायची

बाळाला पूरक आहार कसा द्यायचा.

**नवीन कौशल्य शिकण्यासाठी, आपण छोटी नाटीका आणि व्यवहारीक प्रात्यक्षकिांचा बैठकी दरम्यान उपयोग करून सराव करू.**

## ३. पुढील महिन्याची योजना


**नव्याने मिळवलेले ज्ञान आणि कौशल्य यांच्यावर आधारीत आपण पुढील महिन्याच्या कार्य योजना तयार करू, जसे-**

- तिसऱ्या तीन महिन्याच्या कालावधी दरम्यान प्रसुतीमध्ये मदत करण्यासाठी कमीत कमी दोन वेळा मातेची भेट घ्यायला सुरूवात करणे.
- नवजात बाळाची पुरेशी काळजी घेण्याची खात्री करण्यासाठी जन्माच्या दिवशी कुटुंबाची भेट द्यायला सुरूवात करणे.
- बाळ जेव्हा ५-६ महिन्याचे होईल तेव्हा त्याला वेळच्या वेळी त्यांनी पूरक आहार सुरू केल्याची खात्री करण्यासाठी कुटुंबाला भेट द्यायला सुरू करणे.



## या बैठकीमध्ये प्रत्येक महिन्याला आपण काय करणार आहोत?







### पुर्नपाहणी

गेल्या महिन्याच्या आपल्या कार्यामधून आपण काय शिकलो?

### नवीन विषय शिकणे

विविध तंत्र आणि वागणुकीसंबंधी कोणती नवीन माहिती आपण कुटुंबाला दिली पाहिजे?

### नियोजन

चर्चा केलेल्या विषयासंबंधी पुढील महिन्यात करायच्या नवीन कार्याचे नियोजन.





# याचा अर्थ आपल्यासाठी हे अतिरीक्त काम असेल?

गोष्टीच्या मदतीने सहभागींना सांगा की कष्ट करून काम करणे आणि हुशारीने काम करणे यातील फरक समजून घेण्याचा प्रयत्न करू.

गोष्ट (जी उजव्या बाजूला दिलेली आहे) सहभागींना मोठ्याने वाचून दाखविणे. त्यांना काय वाटते हे त्यांना विचारणे.

स्पष्ट करणे:
उद्देश असा आहे की अतिरीक्त काम करून नव्हे तर हुशारीने काम करून चांगले परिणाम मिळवा.

आपण खूप काम कारतो, परंतु आपल्याला नेहमीच चांगले परिणाम मिळत नाहीत. एकत्रितपणे काम करणे आणि हुशारीने काम करणे शिकण्यामुळे आपल्याला कमी काम करून जास्त परिणाम मिळतील.

हुशारीने काम करून आपल्या कामाचा भार कमी होऊ शकतो. उदाहरणार्थ, आपण प्रत्येक दिवशी ३-५ घरांना भेटी देणे अपेक्षित आहे. आपण जर हुशारीने काम केले तर तेवढेच परिणाम केवळ १-२ घरांना भेट देऊन मिळू शकतात. हे कसे करायचे ते आपण या बैठकीमधून शिकणार आहोत.

## गोष्ट :

केवळ कष्ट करून काम करणे पुरेसे नाही, तर हुशारीने काम केले पाहिजे!

एका गावामध्ये अभिषेक व साहिल असे जुळे भाऊ रहात होते. त्यांच्या लाकूड कापण्याच्या कौशल्यामुळे ते ओळखले जायचे आणि त्यांना मान दिला जायचा. एक दिवस त्यांच्यामध्ये पैज लागली की एकाच दिवशी जो कोणी जास्त लाकूड कापेल त्याला त्यांच्या वडिलांकडून विशेष भेट मिळेल. ते दोघेही सकाळी लवकर उठून एकत्रितपणे जंगलात गेले, त्यांच्या सोबत त्यांची कुऱ्हाड होती आणि त्यांनी जलद लाकूड कापायला सुरूवात केली.

अभिषेकच्या लक्षात आले की झाड कापून झाल्यावर साहिल थोडावेळ विश्रांती घ्यायचा. अभिषेकला वाटले की स्पर्धा जिंकण्यासाठी ही चांगली संधी आहे. त्याने विश्रांती न घेता लाकूड कापणे चालू ठेवले, ज्यामुळे सरतेशेवटी निश्चितपणे त्याने जास्त लाकूड कापलेले असले पाहिजे. साहिलने हे पाहिले होते, पण त्याला चिंता नव्हती. त्याने प्रत्येक झाड कापल्यानंतर विराम घेण्याचे चालू ठेवले.

दिवस संपल्यानंतर अभिषेकने पाहिले की त्याने इतके प्रयत्न करून देखील त्याच्यापेक्षा साहिलचा लाकडाचा ढीग मोठा होता. आश्चर्य वाटून त्याने साहिलला विचारले भावा, प्रत्येक झाड कापल्यानंतर तू विश्रांती घ्यायचास आणि तुझ्यापेक्षा जास्त कष्ट करून देखील तू माझ्यापेक्षा जास्त लाकूड कसे काय कापु शकलास?


साहिल हसला आणि म्हणाला, मित्रा, झाडे कापण्याच्या दरम्यान मी विश्रांती घेतोय असे तुला वाटत होते, पण प्रत्यक्षात मी माझ्या कुऱ्हाडीची धार तीव्र करीत असे. त्यामुळे, माझ्यापेक्षा तू जास्त करून देखील तुझ्या एवढया वेळात मी जास्त लाकूड कापू शकलो.



# याचा अर्थ आपल्यासाठी हे अतिरीक्त काम असेल?



नाही. आपण सध्या जितके काम करणे अपेक्षित आहे त्यापेक्षा जास्त काम करण्याची आपल्याला गरज नाही.



आपण जास्त हुशारीने काम करायला शिकू आणि आपल्या कामामधून चांगले परिणाम कसे मिळतील हे आपण शिकू.





# आरोग्य आणि एकात्मिक बाल विकास योजना कार्यक्रमामध्ये काय साम्य आहे ?

कार्ड दाखविणे आणि विचारणे:

आरोग्य आणि एकात्मिक बाल विकास योजना कार्यक्रम यांनी का एकत्र काम केले पाहिजे ?

**एकात्मिक बाल विकास योजना आणि आरोग्य कार्यक्रमाचे लक्ष्य एकच आहे.**

आरोग्याविषयी जागरूकता आणि आरोग्यदायी वागणुकीची खात्री करणे.
सर्व कुटुंबांना आरोग्य सेवा मिळत असल्याची खात्री करणे.
या माध्यमाद्वारे, विशेषत: महिला व मुलांचे मृत्युचे प्रमाण आणि कुपोषण कमी करणे.

**आशा आणि अंगणवाडी सेविकेने एकत्रित लक्षपूर्वक काम केल्यास**
**कमी प्रयत्न करून देखील चांगले परिणाम मिळू शकतात.**





Module 1.indd 12 3/18/2018 1:31:36 PM

## आरोग्य आणि एकात्मिक बाल विकास योजना कार्यक्रमामध्ये काय साम्य आहे ?



जागरूकता वाढविणे.

आरोग्य आणि पोषण सेवेच्या संपर्कात

सुधारणा करणे.


मृत्यु आणि कुपोषण कमी करणे.











# महिला पर्यवेक्षक आणि सहायक नर्स मिडवाईफची भूमिका

कार्ड दाखविणे.

उजव्या बाजूला दिलेल्या यादीचा वापर करून महिला पर्यवेक्षक आणि सहायक नर्स मिडवाईफला पर्यवेक्षक भूमिका स्पष्ट करून सांगणे.

स्पष्ट करून सांगणे की आरोग्य सेवा पुरविण्याच्या आणि रेकॉर्ड ठेवणे आणि रिपोर्ट करणे याच्यापेक्षा अतिरीक्त सहायक नर्स मिडवाईफचे हे काम आहे.

## १. समर्थन

**अंगणवाडी सेविका/आशा यांना त्यांचे काम प्रभावीपणे करण्यासाठी मदत करणे.**
**नवीन ज्ञान/माहिती प्राप्त करण्यासाठी मदत करणे.**

काम करण्याची नवीन पध्दत शिकायला मदत करणे.
चुका दुरूस्त करण्यास मदत करणे.

## २. समस्या सोडविणे

**आशा/अंगणवाडी सेविका आपापसात सोडवू न शकणाऱ्या समस्या सोडविण्यास मदत करणे.**

आशा / अंगणवाडी सेविकाचे न ऐकणाऱ्या कुटुंबांना पटवून देणे.
आशा / अंगणवाडी सेविकाच्या समस्या वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे नेणे.

## ३. पुर्नपाहणी


**उद्देष साध्य केले जातात का हे पाहण्यासाठी पुर्नपाहणी करणे.**

अंगणवाडी सेविका/आशा यांच्या काम आणि रेकॉडचे निरीक्षण करणे.
समाजातील कुटुंबांना भेट देणे आणि त्यांना आरोग्य सेवा आणि माहिती मिळते का नाही हे तपासून पहाणे.
माहिती गोळा करणे आणि त्यांचे विश्लेषण करणे.



# महिला पर्यवेक्षक आणि सहायक नर्स मिडवाईफची भूमिका










# बैठकीनंतर काय होईल?

**कार्ड दाखविणे आणि स्पष्ट करून सांगणे:**

- आपल्या प्रयत्नामुळे मासिक बैठक थांबणार नाही.
- हे केवळ आपल्या मासिक बैठकीपासून सुरू होईल.
- बैठकीनंतर लोकांना त्यांची वागणूक बदलण्यासाठी आणि त्यांना आरोग्य व पोषण सेवा मिळण्यसाठी तुमचे प्रयत्न सुरू होतील.
- तुम्ही अनेकदा यशस्वी व्हाल, परंतु काहीवेळा तुम्हाला अडचणींचा सामना करावा लागेल.
- तुम्हाला मदत करण्यासाठी सर्व स्तरावर पर्यवेक्षक आहेत - महिला पर्यवेक्षक, सहायक नर्स मिडवाईफ, बाल विकास प्रकल्प अधिकारी, वैद्यकीय अधिकारी आणि गट संसाधन समूह (बीआरजी) आणि जिल्हा संसाधन गट (डीआरजी)
- आपण एकत्रितपने प्रश्नाचे उत्तर शोधू आणि यशस्वी होऊ.



# बैठकीनंतर काय होईल ?




सर्व महिला आणि मुलांपर्यंत पोहचणे

एक, एक करून समस्या सोडविणे.

गृह भेटी आणि आरोग्य आणि पोषण सेवा

प्रश्नांचे उत्तर




समस्या

पर्यवेक्षण

गृह भेटी करीत असताना समोर येणाऱ्या समस्या

महिला पर्यवेक्षक (एलएस), सहायक नर्स मिडवाईफ, बाल विकास प्रकल्प अधिकारी व वैद्यकीय अधिकारी द्वारा पर्यवेक्षण



# या मासिक बैठकींमध्ये आपण कोणत्या विषयांचा समावेश करणार आहोत?

**कार्ड दाखविणे**

**विचारणे:**

● कृपया हे चित्र बारकाईने पहा आणि यामध्ये काय दिसते ते मला सांगा.

थोडी चर्चा करा, त्यांना स्पष्ट करून सांगा की आपण वेळोवेळी या चित्राबाबत बोलत राहू या.

सहभागींनी चित्राबद्दलची त्यांची मते सांगितल्यावर त्यांना चित्र स्पष्ट करून सांगणे:

● हे चित्र बाळाच्या गर्भधारणेपासून ते मूल २ वर्षाचे होईपर्यंतच्या पहिल्या १००० दिवसासंबंधी आहे.

- गर्भधारणा कालावधी : २८० दिवस
- पहिल्या दोन वर्षांचा कालावधी : ३६५ + ३६५ = ७३०
- एकूण : १०१० दिवस, किंवा अंदाजे १००० दिवस

● या चित्रामध्ये या कालावधीत माता व मूलाचा प्रवास कोणत्या मार्गावरून होणार आहे ते दाखविलेले आहे, त्यासोबत गर्भधारणेची महिन्याने होणारी प्रगती जन्मापर्यंत (शून्य प्रगती) आणि त्यानंतर मुलाची महिन्याची प्रगती २ वर्षापर्यंत (२४ महिने) दिसत आहे.

● हा कालावधी महत्वाचा का आहे?

- सर्व माता मृत्यु या कालावधीत होत असतात.
- सर्व मृत बालक, नवजात शिशू मृत्यु आणि तान्हे बाळ मृत्यु या कालावधीत होत असतात.
- सर्व कुपोषण या कालावधीत सुरू होत असतात.
- सर्व नको असणाऱ्या गर्भधारणा या कालावधीत होत असतात.

या बैठका प्रामुख्याने या समस्याविषयी चर्चा करणे आणि जास्त माहिती शिकण्यासाठी, तसेच एकत्रितपणे समस्यचे उच्चाटन करण्यासाठी नियोजन करण्याकरीता होत असतात. याविषयी आपण प्रत्येक महिन्याला सविस्तर चर्चा करू.

उजव्या बाजूला दिलेल्या उदाहरणांच्या यादीचा वापर करून आपण पुढील वर्षाच्या प्रत्येक महिन्यात किंवा जास्त आपण शिकणार असणाऱ्या विषयाच्या प्रकारची माहिती द्या, प्रत्येक महिन्यात दोन विषय असतील.

५-१० मिनिटाची विश्रांती घेणे.


**मासिक बैठकीमध्ये शिकण्याच्या विषयाची उदाहरणे**

- गृह भेटीच्या वेळी वापरण्यात येणाऱ्या नियोजकाची तयारी कशी करावी.
- संस्थात्मक जन्माची तयारी करणे.
- जन्मानंतर आई व बाळाची काळजी घेणे.
- वेळेपूर्वी जन्मणारे बाळ ओळखणे आणि त्याची काळजी घेणे.
- मातांना असणाऱ्या धोक्याची चिन्हे ओळखणे आणि त्यासाठी कुटुंबाने काय केले पाहिजे.
- संपुर्ण सुरक्षततेची खात्री कशी करावी.
- कुटुंब नियोजन आणि त्याच्या पद्धती याविषयी कोणाला सल्ला द्यावा.
- पूरक आहार
- गंभीर कुपोषित बालक ओळखणे आणि त्यांची काळजी घेणे



# या मासिक बैठकींमध्ये आपण कोणत्या विषयांचा समावेश करणार आहोत?






**लाभार्थींशी संपर्क करण्याची योग्य वेळ**





## आपण कोठून सुरूवात करावी ?

विश्रांतीनंतर सहभागींना सांगणे की आता आपण आपल्या खऱ्या कामाला सुरूवात करूया.

कार्ड दाखविणे आणि सहभागींना वाचायला सांगणे.

विचारणे

कोणतेही कुटुंब वगळलेले नाही याची आपण खात्री कशी करावी ?

छोटीशी चर्चा होऊ देणे, सहभागींना सूचना  करू द्याव्यात.

समारोप करताना म्हणणे :

सर्व कुटुंबांपर्यंत पोहचण्यासाठी, आपण काम करीत असलेल्या क्षेत्रामध्ये कोणती कुटुंबे राहतात हे समजावून घेणे, विशेषत: ज्यांना आपण सेवा देणार आहोत त्यांची माहिती करून घेणे आवश्यक आहे. आपल्याला त्या सर्वांची माहिती आहे का ? आपल्याला त्या सर्वांची माहिती आहे याची खात्री कशी करायची ?

थोड्याशा चर्चेनंतर पुढील कार्ड घेणे.



# आपण कोठून सुरूवात करावी ?



## आपले उद्देश :


१. आपल्या समाजातील सर्व कुटुंबांनी आरोग्यदायी वागणूक ठेवली पाहिजे.

२. आपल्या समाजातील सर्व कुटुंबे महत्वाच्या सर्व आरोग्य सेवा मिळण्यासाठी पात्र असल्या पाहिजेत.




**आपला उद्देश, कोणालाही न वगळता सर्व कुटुंबापर्यंत पोहचणे.**





# आपल्या स्वत:च्या क्षेत्राविषयी आपल्याला संपूर्ण माहिती आहे काय ?

**कार्ड दाखविणे. प्रत्येक मुद्दयाची थोडक्यात चर्चा करणे.**
**सर्व सहभागींची वास्तविक स्थिती मिळविणे (सहभागींनी सांगितलेल्या स्थितीसंबंधी रेकॉर्ड तयार करणयासाठी डायरीमध्ये नोंद करणे).**

- किती अंगणवाडी सेविकांना आपल्या कार्यक्षेत्राच्या सिमांची निश्चित माहिती नाही ? ज्या गावांमध्ये एकापेक्षा जास्त अंगणवाडी केंद्रे आहेत त्यांचे काय ?
- ज्या ठिकाणी केवळ मागासवर्गीय राहतात त्या ठिकांच्या टोलाजच्या स्थितीविषयी काय ? जेथे केवळ मुस्लीम राहतात तेथील टोलाजच्या स्थितीविषयी काय ? कोणत्याही अंगणवाडी केंद्राद्वारा समावेश न केलेल्या अशा वगळलेल्या टोलाज आहेत काय ?
- प्रत्येकाकडे त्यांच्या अंगणवाडी क्षेत्राचा नकाशा आहे काय, ज्यामध्ये प्रत्येक टोला आणि प्रत्येक टोलामधील प्रत्येक घर दाखविलेले आहे ? प्रत्येक घराला क्रमांक दिलेले आहेत काय ?
- घरोघर जाऊन केलेले यापूर्वीचे सर्वेक्षण केव्हा केलेले आहे ? प्रत्येकाकडे अद्यावत सर्वेक्षण रजिस्टर आहे काय ? नकाशामध्ये दाखविलेली संख्या आणि सर्वेक्षण रजिस्टरमध्ये नोंद असणारी संख्या जुळतात काय ?

**केलेल्या नोंदीच्या आधारावर, अंगणवाडी क्षेत्र निश्चित करण्यासाठी महिला पर्यवेक्षक/सहायक नर्स मिडवाईफनी कार्यक्षेत्राचे सिमांकन करण्यासाठी माहिती देणे आवश्यक आहे आणि या बैठकीनंतर लवकरात लवकर त्यांना भेट देण्याचे नियोजन करावे**



# आपल्या स्वत:च्या क्षेत्राविषयी आपल्याला संपूर्ण माहिती आहे काय?



- तुमच्या अंगणवाडी केंद्राच्या सिमा निश्चित केलेल्या आहेत काय?
- यापूर्वीचे कुटुंबांचे सर्वेक्षण केव्हा झालेले होते? ते पूर्ण झाले काय?
- आपण कोणत्याही कुटुंबाला वगळलेले नाही याची आपल्याला खात्री आहे काय?
- कोणतेही मागासवर्गीय कुटुंब वगळलेले नाही याची खात्री आहे काय?





# पुढील महिन्याच्या कार्याचे मुद्दे

**रजिस्टर १ व नकाशा अद्यावत करणे.**

**सुधारितची मासिक अधिकृत यादी (एमआयएस) तयार झाली असेल तर खालीलप्रमाणे सूचना करणे:**

१. नकाशा अद्यावत करणे.

२. कुटुंब तपशील रजिस्टर (रजी. क्र. १) अद्यावत करणे आणि सध्या गर्भवती असणाऱ्या महिलांच्या एलएमपीची नोंद करणे आणि इडीडी मोजणे.


**पुढील बैठकीपर्यंत दोन्ही तयार करणे.**
नकाशा व रजिस्टर १ कसे अद्यावत करायचे हे स्पष्ट करून सांगण्यासाठी पुरेसा वेळ देणे. यासाठी सुधारीत एमआयएस सुविधा पुस्तिकेचा वापर करणे.

२०१७ मध्ये जर घरोघरी जाऊन केलेले सर्वेक्षण झालेले असेल (एप्रिल मध्ये किंवा त्यापुर्वी किंवा त्यानंतर) तर एप्रिल २०१८ पूर्वी ते पुन्हा करण्याची गरज नाही. २०१७ पर्यंत अद्यावत झाले नसेल तर पुढील महिन्यात अद्यावत केले पाहिजे.

कुटुंब तपशील रजिस्टर जेव्हा अद्यावत केले जाईल, त्याचवेळी नकाशादेखील अद्यावत करणे.

स्पष्ट करून सांगणे की आपण अद्यावत माहितीचा वापर पुढील बैठकीत इतर रजिस्टर अद्यावत करण्यासाठी करू.

दुसरे दिवशी त्यांना नकाशा व रजिस्टर घेऊन येण्यास सांगणे.



# पुढील महिन्याचे कार्य करण्याचे मुद्दे



१. कुटुंब तपशील रजिस्टर (रजिस्टर १) अद्यावत करणे.

२. नकाशा अद्यावत करणे.




सहभागींनी पुढील बैठकीला येताना अद्यावत नकाशा व रजिस्टर १ आणायला सांगणे.





# आपल्या स्वत:च्या क्षेत्राविषयी आपल्याला संपूर्ण माहिती आहे काय?

कार्ड दाखविणे. कार्डावरील प्रत्येक मुद्दा स्पष्ट करून सांगणे आणि तुम्ही (महिला पर्यवेक्षक/सहायक नर्स मिडवाईफ) सेविकाला पुढील महिन्यात कशी मदत आणि समर्थन करणार त्याचे वर्णन करणे.


- ज्या अंगणवाडी केंद्राच्या सिमा निश्चित केलेल्या नाहीत, त्यांच्यासाठी सिमा निश्चित करायला महिला पर्यवेक्षक / सहायक नर्स मिडवाईफ मदत करतील.
- कामाची पुर्नपाहणी करण्यासाठी ती शक्य असेल तितक्या गावांना भेट देईल आणि जेव्हा गरजेचे असेल त्यावेळी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यास मदत करेल.
- कार्यपद्धतीमध्ये काही समस्या उद्भवल्या तर त्या सोडविण्याकरीता ती मदत करेल.



# महिला पर्यवेक्षक / सहायक नर्स मिडवाईफ पुढील महिन्यात काय करतील?



- अंगणवाडी केंद्राच्या कार्यक्षेत्र / सिमा निश्चित करण्यासाठी मदत करेल.
- रजिस्टर १ आणि नकाशा अद्यावत करण्यास समर्थन देतील.
- कोणत्याहि नर्माण झालेल्या समस्या सोडवतील.





१. ही मासिक बैठक का?
२. गृहभेट नियोजक तयार किंवा अद्यावत करणे आणि गृह भेटी सुरू करणे.
३. अंगणवाडी केंद्रावर सामाजिक घटनांचे नियोजन आणि आयोजन करणे.
४. नवजात शिशूला केल्या जाणाऱ्या स्तनपानाचे निरीक्षण करणे - का व कसे
५. अशक्त नवजात शिशू ओळखणे आणि काळजी घेणे.
६. पूरक आहार - आहार विविधता
७. महिलांमधील ॲनेमीयाला प्रतिबंध करणे.
८. मुलांच्या वाढीचे मुल्यांकन
९. वेळेनुसार पूरक आहार सुधारत असल्याची खात्री करणे.
१०. पूर्णत: स्तनपान चालू असण्याची खात्री करणे.
११. अशक्त नवजात शिशूची काळजी घेणे-किती अशक्त शिशू आपल्याकडून राहिले?
१२. वेळेवार पूरक आहार सुरू केल्याची खात्री कशी करावी.
१३. गंभीर तीव्र कुपोषण ओळखणे आणि प्रतिबंध करणे.
१४. आजारीपणातील आहार.
१५. स्तनपानासंबंधीच्या बाबतीत मातांना समर्थन देणे.
१६. अशक्त नवजात शिशूची कांगारू माता निगाच्या मदतीने काळजी कशी घ्याल.
१७. आजारी नवजात ओळखणे आणि पुढील उपचारासाठी शिफारीस करणे.
१८. कुपोषण व मृत्यू टाळण्यासाठी आजारीपणांना प्रतिबंध करणे.
१९. मुली आणि किशोरवयीन मुलांच्या ॲनेमीयाल प्रतिबंध करणे.
२०. संस्थात्मक आणि गृह प्रसुतीसाठी जन्माची तयारी करणे.
२१. गर्भावस्थेदरम्यान तयारी: नवजात बाळाची निगा आणि कुटुंब नियोजन.

